



# अनामप्रेम-वार्षिक अहवाल
## २०२४-२०२५

www.anamprem.org

# अनामप्रेम

## विश्वस्त मंडळ




डॉ. गिरीश कुलकर्णी
(संस्थापक)



मा. अरूण शेठ
(पालक)



इंजि. अजित माने
(अध्यक्ष)



डॉ. बापूसाहेब कांडेकर
(उपाध्यक्ष)



डॉ. प्रकाश शेठ
(उपाध्यक्ष)



मा. गोपीनाथ सरफरे
(उपाध्यक्ष)



मा. अनिल गावडे
(सचिव)



मा. राधाताई कुलकर्णी
(खजिनदार)



डॉ. सायली सतीश सोमण
(सहसचिव)



मा. नितीन थाडे
(सहसचिव)



डॉ. रवींद्र सोमाणी
(मा. विश्वस्त)



सी.ए. अशोक पितळे
(मा. विश्वस्त)



ॲड. श्याम असावा
(मा. विश्वस्त)



मा. अविनाश बोपर्डीकर
(मा. विश्वस्त)



डॉ. मेघना मराठे
(मा. विश्वस्त)



मा. स्वाती रानडे
(जेष्ठ मार्गदर्शक)



श्री. जे.आर. मंत्री
(जेष्ठ मार्गदर्शक)

# अनामप्रेम

## ध्येयदृष्टी

दिव्यांग व्यक्ती आणि बालकांना शिक्षण, आरोग्य, व्यवसायिक कौशल्ये व सामाजिक समानतेच्या संधी उपलब्ध करून देत, त्यांच्या आत्मविश्वास, सन्मान आणि स्वावलंबनाला बळकटी देणारी समृद्ध व शाश्वत सामाजिक-आर्थिक प्रणाली निर्माण करणे आणि समर्थ जीवन जगण्यास सक्षम करण्यासाठी अनामप्रेमची कटिबध्दता.

## कार्यउद्देश

दिव्यांग व्यक्ती व बालकांसाठी शिक्षण, आरोग्यसेवा, पुनर्वसन, कौशल्यविकास, समुपदेशन व सामाजिक समावेशनाच्या गुणवत्तापूर्ण आणि सुलभ सेवांचे जाळे उभारणे; समुदाय, तज्ञ संस्था व शासन यांच्या सहकार्याने टिकाऊ उपक्रम विकसित करणे; आणि प्रत्येक लाभार्थ्यांच्या क्षमतांची वाढ करून त्यांना स्वावलंबन, सन्मान आणि सक्रिय सामाजिक सहभागासाठी मार्गदर्शन करणे.



# अनामप्रेमचा सेवारंग... माध्यमांच्या नजरेतून



लोकमत

मस्ट READ

## ‘आम्हाला दया नको; संधी द्या’, अनामप्रेमच्या मुलांची साद

दिव्यांगांना नवदृष्टी देणारे घर 'अनामप्रेम'मधील मुले. इन्सेटमध्ये 'अनामप्रेम' वसतिगृह.

### नि:शुल्क निवासीव्यवस्था

अनामप्रेमच्या येथील शाखेचे प्रमुख जे. आर. मंत्री यांनी संस्थेच्या शहरातील सुरुवातीविषयी सांगितले. ते म्हणाले, 'दिव्यांगांना स्वावलंबी बनवणे हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून संस्थेची सुरुवात झाली. मराठवाड्यातील दिव्यांग मुलांना शिक्षण घेताना अनेक अडचणी येतात. घरची हलाखीची परिस्थिती, पालकांमध्ये माहितीचा अभाव अशा अडचणी दिव्यांग मुलांच्या स्वावलंबनात बाधा ठरतात. योग्य वेळी मार्गदर्शन मिळाले तर त्यांनाही उत्तम करिअर करता येईल'.

### समान वागणुकीची अपेक्षा

अनामप्रेमच्या मुलांशी संवाद साधला. ज्ञानेश्वर काकडे म्हणाला, 'आमच्यासारख्या लोकांना समाज स्वीकारत नाही. आम्हाला रस्ता ओलांडताना तुमच्या मदतीची आवश्यकता असते, पण लोक हातावर पैसे ठेवून जातात. अशा वेळी वाईट वाटते'. देवानंद लांडगे, शंकर वाघळे म्हणाले, 'आम्हाला आमच्या मेहनतीचे फळ मिळावे. शासन सगळ्याच दिव्यांगांना नोकरी देऊ शकत नाही. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रात ज्या कंपन्या आहेत, त्यांनी दिव्यांगांना ...

### संगणक कक्षासाठी प्रयत्नशील

राज्यभरातून आलेली अंध, दिव्यांग मुले संस्थेत राहून शिक्षण घेत आहेत. येथे त्यांना मोफत निवास, भोजन, वैद्यकीय, शैक्षणिक सुविधा मिळतात. त्यामुळे परिस्थितीमुळे शिकू न शकणारी मुले या ठिकाणी राहून आपली स्वप्ने साकार करण्यासाठी प्रयत्न करतात.

दिव्यांग पुनर्वसन केंद्र ... देणारे घर:

RAJESH BHASKAR GAIKWAD

(रा. भा. गायकवाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

## गणेश बावस्कर ... क्रिकेट संघात निवड

रिहॅब सेंटरमध्ये उपचार... मागील वर्षी झोळीतून ... होते, तोच गणेश महाराष्ट्र ... क्रिकेटमध्ये प्रतिनिधित्व करणार आहे. गणेश त्याच्या या यशाचे श्रेय डॉक्टर प्रकाश शेठ, डॉ. सुवर्णा गणवीर, विखे पाटील ...

... ग्वाल्हेर येथे पुढील ... होणार आहेत. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्र व्हीलचेअर क्रिकेट असोसिएशनने महाराष्ट्राच्या संघाकडून खेळण्यासाठी अनामप्रेम स्पायनल कॉर्ड इंजुरी रिहॅब सेंटरचा लाभार्थी व कोऑर्डिनेटर गणेश बावस्कर याची निवड केली आहे. गणेशने नुकत्याच पार ...

लोकमत

## विद्यार्थ्यांची गोलबॉल स्पर्धेत भरारी

## रोजगार केंद्राचे उद्घाटन

## दिव्यांगांसाठीचे कौशल्य विकास केंद्र देशासाठी दिशादर्शक ठरेल

... कडू यांचे प्रतिपादन

अनामप्रेम संस्थेत रोजगार केंद्राचे उद्घाटन प्रसंगी बोलताना बच्चू कडू.

धर्म · समाज · संस्था

## दिव्यांगांना कार्यशाळेतून मन:शांती, ध्येय निश्चिती, कायदेविषयक धडे

# अनामप्रेम – वसतिगृहनिहाय विद्यार्थी संख्या




लाभार्थी ६५

हिंमतभवन वसतिगृह, अ.नगर



लाभार्थी १०५

सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प, निंबळक



लाभार्थी ३०

गौरांग वसतिगृह, निंबळक



लाभार्थी १९

यशवंत प्रकल्प, निंबळक (स्पायनल कॉर्ड एन्जुरी रिहॅब सेंटर)




लाभार्थी १५

अनामप्रेम पुणे वसतिगृह



लाभार्थी १५

मराठवाडा वसतिगृह, छ. संभाजीनगर




## एकुण लाभार्थी २४९

अनामप्रेम संस्थेची महाराष्ट्र शासनाच्या 'नमो दिव्यांग' अभियानांतर्गत जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.



# ।। नवी दिशा, नवी आशा ।।

समाजातील सर्वात वंचित घटकांसाठी 1989 पासून स्नेहालय काम करीत आहे. हे काम करीत असताना आरंभी आम्हा कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह होता. त्यामुळे समोर येईल ते काम झोकून करण्याची आमची धाटणी होती. समस्याग्रस्त कोणत्याही महिला आणि बालकांसाठी आम्ही दु:ख निवारणाचे काम करायचो. पहिल्या एक तपात स्नेहालय संस्थेच्या कामाचा प्रचंड विस्तार होत गेला. वर्ष 2003 मध्ये लक्षात आले की, समाजातील प्रत्येक प्रश्नाला आपण सुयोग्य न्याय देऊ शकत नाही. स्नेहालय संस्थेतर्फे विविध वंचित घटकांसाठी स्वतंत्र विभाग चालू करणे गरजेचे आहे.

परंतु प्रत्येक विषयावर काम करण्यासाठी स्वतंत्र उपक्रम पुरेसा नव्हता. तर स्वयंप्रेरित स्वतंत्र संघटना उभी करणे आवश्यक आहे. स्वतंत्र संस्थेसाठी नवी टीम हवी होती . स्नेहालय आणि संस्थेचा बाल हक्कांसाठी काम करणारा चाईल्ड लाईन हा विभाग यावर चिंतन मंथन करीत होता. एका दीर्घ घुसळणीतून एक मोठे उद्दिष्ट सर्वांनी स्विकारले. दिव्यांग भगिनी आणि बांधवांसाठी एक स्वतंत्र संस्था निर्माण करण्याचे ते उद्दिष्ट होते.

वर्ष 2005 मध्ये दिव्यांगांच्या प्रश्नांवर सखोल आणि व्यापक सेवा कार्य करण्यासाठी स्नेहालय परिवाराने अनामप्रेम या संस्थेची स्थापना केली. स्नेहालय संस्थेच्या मार्गदर्शनानुसार अनिल गावडे, मंजिरी तांबे, दीपक बुरम, यशवंत कुरापट्टी अशा अनेकांनी आपला दैनंदिन कामाचा व्याप सांभाळून अनामप्रेम संस्थेची एक एक वीट रचली.

मागील दोन दशकांच्या प्रवासात हजारो देणगीदार आणि कार्यकर्त्यांनी आपल्या समिधा अनामप्रेम च्या यज्ञात अर्पण केल्या. हा इतिहास आणि प्रत्येकाचे योगदान नमूद करण्यासाठी अनेक खंडांचा ग्रंथ लिहावा लागेल. कधीतरी हे काम करावेच लागेल.

अनेक स्थित्यंतरांमधून अनामप्रेम संस्थेचे जहाज हेलकावे खात परंतु आपल्या दिशेने पुढे जात आहे. या जहाजासाठी वल्हे मारणारे अनेक निरपेक्ष कार्यकर्ते, विश्वस्त, देणगीदार, सेवक अनामप्रेमला लाभले. ही जेवढी देवाची कृपा आहे तेवढीच वर्तमान कार्यकर्त्यांची समर्पित साधना आणि अनेकांचे आशीर्वाद देखील आहेत.

दिव्यांगांचे 21 प्रकार **RPWD Act** 2016 मध्ये नमूद आहेत .यातील 4 प्रकारांसाठी आपल्या संस्थेचे काम चालू आहे. पुढील काळात अन्य प्रकारच्या दिव्यांगांसाठी स्वतंत्र कार्यकर्त्यांचा संच आणि प्रकल्प उभे करणे हे आपले उद्दिष्ट आहे.

कोणत्याही संघटनेला किंवा संस्थेला लांब पल्ल्याची वाटचाल करायची असेल, तर तिच्याकडे महान आणि नैतिक उद्दिष्ट असणे गरजेचे असते. रोजचे प्रश्न सोडवताना आपली टीम अनेकदा थकते. आपली संस्था जीवंत असल्याने आपसात विचारांचे मतभेद देखील होतात. परंतु त्यात मनभेद कधीही होत नाहीत.आव्हाने समोर आली की, वयम् पंचाधिकम् शतम्, असे म्हणत आपली संघटना एकजुटीने कार्यमग्न होते. हीच बांधीलकी आपल्याला कायम जपणे आवश्यक आहे.

कार्य उन्नत होत असताना सेवेचा किंवा दानाच्या अहंकाराचा वारा आपल्या मनात शिरू नये ,म्हणून आपण दक्ष राहू. सेवा करत असताना आपणच या कामाचे पहिले लाभार्थी आहोत, यामुळेच आपल्या जीवनाला सेवेचा परिसस्पर्श झाला आहे ,हे आपण जाणीवपूर्वक लक्षात ठेवू. आजवर जशी आपले ध्येय आणि उद्दिष्ट यांच्याशी बांधिलकी ठेवली, तशीच पुढेही ठेवू.

पुढील प्रवासाला हार्दिक शुभेच्छा.

डॉ. गिरीश कुलकर्णी
संस्थापक – स्नेहालय,अनामप्रेम

# अनामप्रेमचा आधारवड



दिव्यांग बांधवांसाठी निःस्वार्थ भावनेने कार्य करणारी अनामप्रेम संस्था माझ्यासारख्या अनेकांच्या आयुष्यात आशेचा दिवा बनून आली आहे. कोकणातील साध्या कुटुंबातून मोठ्या कष्टाने उभ्या राहिलेल्या माझ्या प्रवासात ठाणे येथे SMC Infrastructure ही कंपनी स्थापन करताना मी समाजाबद्दलची बांधिलकी कायम जपत आलो. या सामाजिक जाणिवेतूनच स्नेहालय संस्थेच्या माध्यमातून माझा अनामप्रेमशी परिचय झाला–आणि तो पुढे घट्ट नात्यात रूपांतरित झाला.

अनामप्रेमची कार्यतत्परता, पारदर्शकता आणि प्रत्येक दिव्यांग मुलाकडे पाहण्याची संवेदनशील दृष्टी पाहून मनापासून समाधान वाटते. इथले पदाधिकारी, कार्यकर्ते व मार्गदर्शक प्रत्येक मुलाला स्वतःचे मूल मानून ज्या समर्पणाने काम करतात, त्यामुळे अनामप्रेम केवळ संस्था न राहता एक सुरक्षित घर, प्रेमळ कुटुंब आणि सक्षम भविष्याकडे नेणारा आधार बनते.

अंध, मूकबधिर आणि अस्थिव्यंग विद्यार्थ्यांना शिक्षण, कौशल्य-विकास, रोजगार आणि सन्माननीय जीवनाचे दार उघडून देण्याचे कार्य अत्यंत थक्क करणारे आहे. दिव्यांगत्वाचे बंधन बाजूला सारून ही मुले आत्मविश्वासाने, आनंदाने व स्वाभिमानाने जगू लागतात–हीच अनामप्रेमची सर्वात मोठी किमया.

अनामप्रेम संस्थेशी जोडले गेलो, हे माझ्या जीवनातील भाग्य आहे. अशा सेवाभावी संस्थेसाठी योगदान देणे हा माझ्यासाठी गौरव आणि कृतार्थतेचा क्षण आहे. समाजातील प्रत्येक दिव्यांग व्यक्तीला समर्थ, स्वावलंबी आणि सन्माननीय जीवन मिळावे, यासाठी संस्था जे अदम्य कार्य करीत आहे, त्यास माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा.

**श्री. अरुण रामचंद्र शेठ (भाई)**
पालक– अनामप्रेम

# निःस्वार्थ सेवेचा दीपस्तंभ



दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षण, प्रशिक्षण, रोजगार व कौशल्य विकासासाठी नगर, पुणे व संभाजीनगर जिल्ह्यात कार्यरत असलेली *अनामप्रेम संस्था* ही केवळ एक संस्था नसून, अनेक वंचित व गरजू कुटुंबांसाठी आशेचा किरण आहे. समाजातील दुर्लक्षित घटकांसाठी निःस्वार्थ भावनेने कार्य करणाऱ्या या संस्थेचे कार्य मी जवळून पाहत असून त्याचा मला अभिमान वाटतो.

अपघातात पाठीचा कणा मोडलेल्या गरीब रुग्णांसाठी उपचारानंतर पुनर्वसनाची नितांत गरज लक्षात घेऊन *स्पायनल कॉर्ड इंज्युरी रिहॅबिलिटेशन सेंटर* इसळक, अहिल्यानगर येथे सुरू करण्याचा संकल्प अनामप्रेम संस्थेने केला आणि तो प्रत्यक्षात उतरविला. या केंद्रातून आतापर्यंत वीसहून अधिक रुग्ण यशस्वीपणे बरे होऊन आपल्या कुटुंबात परतले असून, ते सन्मानाने व आनंदी जीवन जगत आहेत, ही बाब अत्यंत समाधानकारक आहे.

अनामप्रेम संस्थेच्या प्रामाणिक व पारदर्शक कार्यपद्धतीमुळे अनेक नामांकित कंपन्यांनी सीएसआर फंडाच्या माध्यमातून संस्थेला मदतीचा हात दिला आहे. या सहकार्यामुळे संस्थेत विविध नवीन उपक्रम, सुविधा व प्रकल्प साकार होत असून, त्याचा थेट लाभ दिव्यांग विद्यार्थी व रुग्णांना मिळत आहे.

समाजातील दुर्बल घटकांना स्वावलंबी बनविण्याचे अनामप्रेम संस्थेचे कार्य खरोखरच प्रेरणादायी आहे. या संस्थेचा पालक म्हणून मी मनापासून शुभेच्छा देतो आणि भविष्यातही ही संस्था समाजसेवेच्या या पवित्र कार्यात अधिक व्यापक योगदान देईल, असा मला पूर्ण विश्वास आहे.

**–डॉ. प्रकाश शेठ**
पालक– अनामप्रेम

# अनामप्रेम : दोन दशकांची वाटचाल



अनामप्रेमच्या दोन दशकांच्या प्रवासाकडे पाहताना माझ्या मनात एक समृद्ध, खोलवर रुजलेला वटवृक्ष डोळ्यासमोर उभा राहतो. मागे वळून पाहताना गोड-कटू अनुभवांनी भरलेला हा प्रवास अधिक खुला, अधिक अर्थपूर्ण वाटतो.

स्नेहालयच्या चाईल्ड लाईन प्रकल्पात आम्ही कार्यकर्ते कार्यरत होतो. रोज समोर येणाऱ्या घटना, येणाऱ्या केसेस आणि सभोवताली घडणाऱ्या अमानवीय प्रसंगांनी आमची संवेदनशीलता वाढत होती. स्नेहालय शोषित महिला आणि बालकांसाठी काम करत असताना अनेक मर्यादा, अडचणी, व्यवस्थेतील त्रुटी यांची जाणीव होत गेली. सर्व कार्यकर्ते एकत्र बसून या प्रश्नांवर चर्चा करत.

याच काळात चाईल्ड लाईनला सहा वर्षांच्या मतिमंद मुलीबाबत माहिती मिळाली. रेल्वे स्थानकावर सापडलेल्या त्या मुलीला केंद्रात आणून तिची व्यवस्था करण्याचा आम्ही आटोकाट प्रयत्न केला. मात्र, कोणत्याही संस्थेत तिला जागा मिळेनाशी झाली. परिणामी ती मुलगी चार-पाच महिने चाईल्ड लाईन कार्यालयातच राहिली. तिच्या शी-सू काढण्यापासून सर्व सांभाळण्यापर्यंतची जबाबदारी कार्यकर्त्यांवर होती. शासकीय पातळीवर पाठपुरावा केल्यानंतर अखेर चार महिन्यांनी एका संस्थेकडून तिला दाखल करण्याची परवानगी मिळाली. काही महिन्यांनी १८ वर्षांच्या तरुण मतिमंद मुलासंदर्भात असाच प्रसंग घडला.

या घटनांनी दिव्यांग मुलांचे प्रश्न किती तीव्र आणि दुर्लक्षित आहेत, याची जाणीव अधिक प्रखर झाली. स्नेहालय ज्या घटकासोबत काम करत आहे, त्याबरोबरच समाजात अजूनही अनेक समस्या आहेत आणि त्यावर कुणीतरी काम करणे आवश्यक आहे, ही भावना बळावत गेली. अंध, मूकबधीर, अपंग, मतिमंद अशा मुलांच्या अडचणी चिंताजनक वाटू लागल्या. कार्यकर्त्यांमध्ये या विषयांबद्दल प्रगाढ संवेदनशीलता तयार झाली.

याच काळात सर्वांनी मिळून डॉ. गिरीश कुलकर्णी सरांना दिव्यांगांसाठी स्वतंत्र काम सुरू करण्याची विनंती केली. संस्थेचा आणि नव्या कामाचा अनुभव घ्या; हे काम तुम्हीच सुरू करा, असे सांगत सरांनी आम्हाला प्रोत्साहन दिले. आणि याच ठिकाणी अनामप्रेमचा जन्म झाला.

चाईल्ड लाईनचे काम सांभाळताना समाजातील इतर प्रश्नांवरही स्वतंत्रपणे काम करण्याचा निर्णय झाला. सुरुवातीला सर्वांना झेपेल असा एकच प्रश्न हाती घेण्याचे ठरले. अनामप्रेमची नोंदणी झाली आणि नगरमध्ये कामाचा शुभारंभ झाला. दिव्यांग मुलांसाठी उपलब्ध असलेल्या योजनांचा, पर्यायांचा शोध सुरू झाला.

यावेळी अंध मुलांसाठी काम करणाऱ्या दीपाली पुराणिक यांची भेट झाली. नगर जिल्ह्यात अंध विद्यार्थ्यांसाठी संगणक प्रशिक्षणाची सुविधा नसल्याने त्यांना मुंबईला जावे लागते, हे लक्षात आले. सर्व कार्यकर्त्यांच्या चर्चेनंतर संगणक प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याचा निर्णय घेतला. संस्थेचे पालक डॉ. हेमंत देशपांडे यांनी पहिला संगणक संच देणगीदाखल दिला. आणि १७ ऑक्टोबर २००६ रोजी अनामप्रेमद्वारे नगर जिल्ह्यातील अंधांसाठी पहिले संगणक प्रशिक्षण केंद्र सुरू झाले. तत्कालीन प्रांत अधिकारी राजेंद्र मुठे साहेब यांच्या हस्ते या केंद्राचे उद्घाटन झाले.

सुरुवातीला चाईल्ड लाईनच्या स्वयंपाकघरात छोटीशी जागा मिळाली. मी चाईल्ड लाईनचा केंद्र समन्वयक असल्याने दोन्ही कामे एकत्र सांभाळणे सोपे गेले. माझे चाईल्ड लाईन चे सहकारीही मनापासून मदत करत. मुलांची संख्या वाढू लागल्याने संगणक प्रशिक्षणाबरोबर इंग्रजी भाषेचे धडे आणि व्यक्तिमत्त्व विकासाचे वर्गही सुरू झाले. शीतल, योगिता, आशिष, अजय, नवनाथ अशी अनेक मुले नियमित येऊ लागली.

पुढे ही जागा अपुरी पडू लागल्याने डॉ. आडकर ट्रस्टकडे विनंती केली. त्यांनी बालकल्याण संकुलातील मोठा हॉल केंद्रासाठी उपलब्ध करून दिला. पुढे काही देणगीदारांकडून संगणक मिळाले आणि प्रशिक्षण केंद्र अधिक सक्षम झाले.

मे २००७ मध्ये अंध व अपंग विद्यार्थ्यांसाठी पहिले राज्यस्तरीय व्यक्तिमत्व विकास शिबिर आयोजित केले. जळगाव, धुळे, पुणे, कोल्हापूर, अहमदनगरातून शंभरहून अधिक विद्यार्थी सहभागी झाले. ब्रेल लिपी, हस्तकला, स्वावलंबन यांचे प्रशिक्षण देण्यात आले. हे शिबिर नंतर दरवर्षीची परंपरा ठरले.

या शिबिरात सुमनताई सातभाई भेटल्या आणि संस्थेसाठी एक कपाट व टेबल तत्काळ उपलब्ध करून दिले. विद्यार्थ्यांनी विनंती केलेल्या ब्रेल वाचनालयासाठी सी.एम. मुनोत यांनी पुस्तकांच्या रॅकची देणगी दिली. काही देणगीदारांच्या मदतीने ब्रेल पुस्तके मिळाली आणि २६ जून २००७ रोजी ब्रेल वाचनालयाचे उद्घाटन झाले.

शिबिरातील विद्यार्थ्यांची कला पाहून आम्हाला दान

नको, आमच्या क्षमतेला बळ द्या हा त्यांचा भाव मनाला भिडला. त्यातूनच अनामप्रेम संगीत मंच स्थापन झाला. कलाकारांनी शेकडो कार्यक्रम सादर केले व मानधनातून स्वतःचा खर्च भागवला – स्वावलंबनाचा एक सुंदर मार्ग जन्माला आला.

कामाचा विस्तार होत असताना स्वतंत्र सेनानी कमलताई आपटे वसतिगृह अचानक बंद झाले आणि अंध विद्यार्थ्यांच्या निवासाचा मोठा प्रश्न निर्माण झाला. मुलांचे शिक्षण थांबता कामा नये, या भावनेतून कार्यकर्त्यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरू केले. आर्थिक संघर्ष, दैनंदिन गरजांची तारेवरची कसरत, कधीकधी फक्त भेळ–भत्ता किंवा वडापाववर भागवलेली भूक – हा काळ अत्यंत कठीण होता.

गुलमोहर रोडवरील डॉ. देशपांडे यांनी त्यांचा स्वतःचा फ्लॅट मुलांच्या निवासासाठी दिला. याच काळात डॉ. गिरीश कुलकर्णी, सुवालालजी शिंगवी (बापूजी), मिलिंद कुलकर्णी, डॉ. सुहास घुले, डॉ. सुचित तांबोळी, प्रमोद कांबळे यांचे मार्गदर्शन व योगदान अमूल्य ठरले.

याच काळात अनामप्रेमच्या विद्यार्थ्यांसोबत श्री. अजित माने आणि अनिता मॅडम यांचे जिव्हाळ्याचे नाते तयार झाले आणि अमूल्य योगदान ठरले. डॉ. बापूसाहेब कांडेकर यांनी मुलांसाठी किराण्याचा खर्च स्वीकारला आणि आजही ते सातत्याने सर्वोतपरी मदत करत आहेत.

एकीकडे संस्थेच्या कामकाजाची चेतनामय वाटचाल सुरू होती. गांधी मैदाना शेजारील व्यायाम शाळेतील कचराकुंडीचे दिव्यांगांचे हिम्मतभवन म्हणून रुपांतर झाले. छोट्या जागेत सुरू असणारे संस्थेचे काम वेगाने वाढत होते. हा वाढता वेग पाहून संस्थेकडे स्वतःची जागा असावी, दिव्यांगासाठी आवश्यक सोई सुविधा निर्माण कराव्यात,
कार्यालयीन कामकाज व समोर येणारे प्रश्न याला अनुसरून विस्तृत काम असावे असे वाटू लागले. यासाठी स्नेहालयने संस्थेची निंबळक येथील दोन एकर जागा अनामप्रेमच्या कामासाठी उपलब्ध करून दिली.

याच भूमीवर सत्यमेव जयते ग्राम उभे राहिले – समीरजी घोष यांच्या मार्गदर्शनातून या ठिकाणी सुरू झालेले रोजगार प्रशिक्षण केंद्र, डॉ. रवींद्र सोमाणी निर्मित रवीनंदा संकुल, सरफरे कुटुंबाच्या योगदानातून गौरांग अभिनव शाळा, श्री अविनाश बोपर्डीकर सरांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असेलले नवनिर्मित उद्योग भवन हे आज अनामप्रेमच्या कार्याचा ओळख बनले आहे.

सुरुवातीच्या काही उज्वल यशोगाथा प्रेरणादायी ठरल्या. त्याचा उल्लेखही जरूर करायला हवा. संगणक प्रशिक्षण केंद्राची पहिली विद्यार्थीनी कु. शीतल गायकवाड ने ३ महिन्याचा बेसिक संगणक कोर्स पूर्ण केला, याच आधारावर तिला मुंबईतील नामांकित कंपनीत नोकरी मिळवली आणि तेथेच स्थायिक झाली.

राज्यस्तरीय व्यक्तिमत्व विकास शिबिरातून आशिष क्षीरसागर, अजय दरेकर, योगिता काळे, सुभाष शिंदे, विकी नायर सारखी अंधवत्वामुळे विश्वास गमावलेली मुले कोणाचाही आधार न घेता शहरामध्ये स्वतंत्र फिरू लागली. त्यांची मोबॅलिटी प्रचंड वाढली. व्यक्तिमत्त्व शिबिर, संगणक प्रशिक्षण केंद्रांतून बाहेर पडणारा प्रत्येक जण वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये स्वतःला आजमावत होता. आईवडिलांच्या मदती शिवाय क्लासला येऊ न शकणारा आशिष आज एम.आय.डी.सी. ते नगर शहरापर्यंत शहर बसने प्रवास करत आहे. दररोज वडिलांसोबत येणारा अजय दरेकर आज रेल्वे मध्ये लिपीकाची नोकरी करतो व स्वतःच्या पायावर उभा आहे. ओठावरती चारोळी व स्वनिर्मीत कवितांचे ब्रेल पुस्तक लिहीणारी योगिता, प्रत्येक कार्यक्रमाचे उत्तम सूत्रसंचालन करायची. तिने डी. एड पूर्ण केले व एस टी महामंडळा मध्ये नोकरी मिळवली. अंशतः अंध असणारा सुभाष शिंदे हा संगणक प्रशिक्षणासाठी अनामप्रेम मध्ये आला. कधी शहराचे तोंड न पाहणारा सुभाष शिंदे दोन वर्षे मुंबईमध्ये जाऊन राहिला. वेगवेगळे प्रशिक्षण घेतले. पुढे चालून अनामप्रेमच्या कामाची जबाबदारी स्विकारली. शेकडो अंध–अपंग–मूकबधीर विद्यार्थ्यांचा पालक बनला. सुभाष अनामप्रेम मधील तळमळीचा कार्यकर्ता, नंतर त्यानेही पोस्ट खात्यामध्ये नोकरी मिळवली आणि स्वतःचे आयुष्य सुस्थित करत इतरांचेही तो भविष्य घडवत आहे.

आज अनामप्रेमचा बहरलेला वटवृक्ष दिव्यांगांसाठी आशेचे, आत्मविश्वासाचे आणि स्वावलंबनाचे केंद्र बनला आहे. डॉ. प्रकाश शेठ मार्गदर्शनाखाली सुरू झालेले स्पायनल कॉर्ड इंज्युरी सेंटर अनेक रुग्णांसाठी जीवनदायी ठरले आहे. डॉ. मेघना मराठे यांची सेवा अनामप्रेमची आरोग्यवाहिनी बनली आहे. पुण्यातील वसतिगृहाचे नेतृत्व डॉ. सायली व सतीश सोमण करत आहेत. अरुण शेठ यांचे सहकार्य अनामप्रेमची आर्थिक उर्जा बनले आहे.

अनामप्रेमच्या दोन दशकांच्या वाटचालीत अनेक देणगीदार, कार्यकर्ते, स्वयंसेवक, मार्गदर्शक आणि हितचिंतकांनी केलेल्या सहकार्यास मनःपूर्वक वंदन. दोन दशकांची ही वाटचाल – शेकडो दिव्यांगांच्या जीवनात आशा, स्वाभिमान व नवसंजीवनी निर्माण करणारी – आज एक तेजस्वी सत्य बनून उभी आहे.

–अण्णासाहेब गावडे
सचिव

# अध्यक्षांचे मनोगत



सक्षमतेकडे वाटचाल – आत्मनिर्भर दिव्यांग घडविण्याचे स्वप्न

दिव्यांग व्यक्तींना केवळ आधार नव्हे तर सन्मानाने जगण्याची संधी मिळावी, या ध्येयाने अनामप्रेम संस्थेचा प्रवास सुरू झाला. आज या प्रवासाला समाजाचा विश्वास, शासनाची साथ आणि असंख्य दात्यांचे बळ मिळत आहे, ही बाब आमच्यासाठी अभिमानाची आहे.

संस्थेची पुढील वाटचाल–अनामप्रेमची पुढील वाटचाल ही समग्र दिव्यांग पुनर्वसन, कौशल्याधारित रोजगार आणि आत्मनिर्भरतेकडे केंद्रित आहे. येत्या काळात संस्थेच्या सर्व प्रकल्पांमध्ये गुणवत्ता, शाश्वतता व रोजगारक्षमतेवर विशेष भर देण्यात येणार आहे.

सहकार्य आणि योगदान–संस्थेच्या कार्यात अनेक सहृदय संस्थांनी मोलाचे योगदान दिले आहे. श्रीमती प्रमिला कुलकर्णी काकू यांनी ‘भगवान भोजन मंदिर’ बांधून दिले. डॉ.रविंद्र सोमाणी यांनी ‘रविनंदा संकुल बांधुन दिले. केएसबी कंपनीने अनामप्रेम संस्थेस ब्रेल प्रिंटर प्रदान करून दृष्टिहीन विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला मोठा आधार दिला, तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी म्बुलन्स व स्कूल बस उपलब्ध करुन दिले. तसेच सीजी पॉवर कंपनी व नोबेल हॉस्पिटल यांच्या सहकार्याने संस्थेच्या उद्योग भवनाची उभारणी पूर्ण झाली असून, या उद्योग भवनाच्या माध्यमातून दिव्यांग युवक–युवतींसाठी रोजगाराभिमुख प्रशिक्षण व उत्पादनाच्या संधी उपलब्ध होत आहेत.

कौशल्य विकास केंद्र व उद्योग भवन–संस्थेच्या कौशल्य विकास केंद्राचा विस्तार करुन ते बहुआयामी प्रशिक्षण केंद्र म्हणून विकसित करण्याचा आमचा संकल्प आहे. उद्योग भवनाच्या माध्यमातून दिव्यांग युवक–युवतींसाठी उत्पादन, पॅकेजिंग, हस्तकला, लघुउद्योग व सेवा क्षेत्रातील प्रशिक्षण व रोजगाराच्या संधी निर्माण केल्या जातील. यामधून ‘शिकून कमावणारा दिव्यांग’ हा संस्थेचा मुख्य उद्देश साध्य होईल.

सीएसआर योगदानाबद्दल कृतज्ञता–संस्थेला आजपर्यंत मिळालेल्या विविध सीएसआर देणग्यांमध्ये डॉ. प्रकाश शेठ यांचा सिंहाचा वाटा असून, त्यांच्या सातत्यपूर्ण मार्गदर्शन, विश्वास व सहकार्यामुळे अनामप्रेम अनेक महत्त्वपूर्ण प्रकल्प साकार करु शकली आहे.

पायाभूत सुविधा व रस्ते विकास–संस्थेच्या निंबळक येथील सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पापर्यंत पक्का रस्ता मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून व जिल्हा परिषदेच्या सहकार्यातून साकार होत आहे. या महत्त्वपूर्ण कार्यासाठी डॉ. बापूसाहेब कांडेकर, डॉ. गिरीश कुलकर्णी, श्री. नितीन थाडे सर, अँड.शाम आसावा सर ,अनिल गावडे सर , सी.ए. अशोक पितळे सर, अभय रायकवाड, उमेश पंडुरे यांनी केलेले परिश्रम अत्यंत मोलाचे असून, त्यांच्या योगदानाबद्दल संस्था कृतज्ञता व्यक्त करते. निवासी प्रकल्प, प्रशिक्षण केंद्र, उद्योग भवन व इतर सुविधा अधिक सक्षम व सुरक्षित करण्यासाठी येत्या काळात विशेष भर देण्यात येणार आहे.

कर्मचाऱ्यांसाठी वसाहत–संस्थेच्या सातत्यपूर्ण आणि गुणवत्तापूर्ण कार्यासाठी समर्पित कर्मचारी हे आमचे मोठे भांडवल आहे. त्यामुळे भविष्यात कर्मचाऱ्यांसाठी निवासी वसाहत उभारण्याचे नियोजन आहे, जेणेकरून त्यांना सुरक्षित, सुलभ व स्थिर निवास व्यवस्था उपलब्ध होईल.

पाणी साठवणूक व शाश्वत वापर–प्रकल्प परिसरात असलेल्या खाणींच्या माध्यमातून पावसाचे पाणी साठवणूक करुन शेततळ्यांची निर्मिती करुन भूजल पुनर्भरण आणि शेती व इतर वापरासाठी शाश्वत पाण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे पर्यावरणपूरक विकासासोबतच संस्थेच्या पाणी स्वयंपूर्णतेकडे मोठे पाऊल उचलले जाईल.

जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र–महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्रासाठी अनामप्रेमची निवड ही आमच्यासाठी मोठी जबाबदारी आणि गौरवाची बाब आहे. या केंद्राच्या माध्यमातून दिव्यांगांसाठी–

* ओळख व नोंदणी * उपचार, थेरपी व समुपदेशन
* सहाय्यक साधनांचे वाटप * शासकीय योजनांची माहिती व लाभ * शिक्षण, प्रशिक्षण व रोजगार मार्गदर्शन

अशा विविध सेवा अधिक प्रभावीपणे राबविण्यात येतील.

मेलझर कंपनीने संस्थेस ५०,००० लिटर क्षमतेची पाण्याची टाकी बांधून दिली असुन स्क्रॅप यार्ड बांधुन देत आहेत. तसेच लायन्स क्लब पुणे विजयनगर व इन्फोसिस कंपनीने संस्थेस सोलर ग्रीड सिस्टिम बसवुन दिली आहे.

निष्कर्ष–अनामप्रेमची पुढील वाटचाल ही दानाधिष्ठित नव्हे तर स्वावलंबनाधिष्ठित असेल. दिव्यांग व्यक्ती समाजाच्या मुख्य प्रवाहात आत्मविश्वासाने उभ्या राहाव्यात यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. या कार्यात समाज, शासन, दाते व हितचिंतक यांची साथ आम्हाला नेहमीच प्रेरणा देत राहील, असा विश्वास आहे.

इंजि. अजित माने, अध्यक्ष
अनामप्रेम संस्था

# अनामप्रेमचे महत्वाचे उपक्रम व मान्यवरांच्या भेटी



गोकाष्ठ उत्पादनाकरिता - गो-उत्पादन प्रकल्पाचा भूमिपूजन सोहळा मा. अरुण शेठ (भाई) मा. अविनाश बोपर्डीकर, इंजि. अजित माने सह अनामप्रेम परिवार यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न झाला.




मेलझर केमिकल प्रा.लि., पुणे या कंपनीच्या सी.एस. आर. फंडातून अनामप्रेमच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पात बांधण्यात आलेल्या ५० हजार लिटर क्षमतेच्या आरसीसी टाकीचा उद्घाटन सोहळा संपन्न झाला.

अनामप्रेम पुणे वसतिगृहातील अंशतः अंध अनिकेत पाडळे या विद्यार्थ्याने राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत पटकावले प्रथम स्थान.

अनामप्रेम संस्थेत जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने विविध क्षेत्रात आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या नवदुर्गांचा सन्मान अनामप्रेम संस्थेच्या गांधी मैदानातील हिम्मतभवन प्रकल्पात तसेच निंबळक येथील सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पात करण्यात आला.



अनामप्रेमची कु.कल्पना कदम हिची उत्कृष्ट राष्ट्रीय खेळाडू म्हणून निवड. राष्ट्रीय स्तरावरील अंध गोलबॉल स्पर्धा नुकत्याच महाराष्ट्रातील गोंदिया येथे पार पडल्या. या स्पर्धेमध्ये दिल्ली, हरियाणा, मध्य प्रदेश, तामिळनाडू, आंध्र प्रदेश, गुजरात यासह देशातल्या विविध राज्यांच्या टीमने भाग घेतला होता. यात महाराष्ट्राच्या टीमने प्रथम स्थान मिळवले.

अनामप्रेम सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पास **VNIT** कॉलेज व प्रयास **NGO** च्या विद्यार्थ्यांची भेट.

एक कदम और फाउंडेशन, पुणे यांच्या सौजन्याने अनामप्रेम संचलित ग्राम प्रकल्पातील ७ अंध विद्यार्थ्यांना मोबाईल व कीबोर्ड भेट देण्यात आले.

संघर्षातून यशाकडे... अनामप्रेम संस्थेची कन्या कु. श्रावणी आणि चि.ज्ञानेश्वर यांचा विवाह सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

अनामप्रेम संस्थेच्या 'सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पास' प्रवरा मेडिकल कॉलेज, लोणी येथील नर्सिंग कोर्सचे विद्यार्थी व कर्मचारी यांची भेट..!

सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पास प्रतिष्ठित शासकीय अधिकाऱ्यांची भेट !

शिक्षणात उत्कृष्टतेची झेप - अनामप्रेमच्या विद्यार्थ्यांचे दहावी व बारावीमध्ये चमकदार यश..

श्री गोंदवलेकर महाराज देवस्थान, गोंदवले यांच्या सौजन्याने आणि संस्थेच्या आधारस्तंभ डॉ. मेघना मराठे यांच्या मोलाच्या पुढाकाराने अनामप्रेम संस्थेला नियमित किराणा साहित्याची मदत होत आहे.

अनामप्रेम संस्थेत अशोक लेलैंड कंपनीचे नवीन वाहन दाखल.

अनामप्रेम संस्था संचलित अनामप्रेम हिंमतभवन वसतिगृह, सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प, पुणे वसतिगृह, मराठवाडा वसतिगृह येथील शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता प्रवेश प्रक्रियेअंतर्गत दिव्यांग विद्यार्थ्यांच्या मुलाखती यशस्वीपणे पार पडल्या.

५ जून रोजी पर्यावरण दिनानिमित्त वन अधिकारी मा. वैशाली सरोदे यांनी सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पास भेट दिली. दिव्यांग विद्यार्थ्यांसोबत वृक्षारोपण करत त्यांनी पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.





>अंध बांधवांसाठी स्वयंचलन कार्यशाळेचे आयोजन. मा.प्रा.योगिता काळे, स.प महाविद्यालय, पुणे व श्री. रघुनाथ बारड, जालना यांचे मार्गदर्शन.

अनामप्रेम आयोजित ब्रेल लिपीचे जनक लुईस ब्रेल यांच्या जयंतीनिमित्त अंधजनांसाठी स्वयंचलन Mobility मनःशांती (Mental Peace), ध्येय निश्चिती (Goal setting) व अपंगांच्या कायदे विषयक कार्यशाळा सत्यमेव जयते ग्राम येथे संपन्न झाला.

---

>अनामप्रेम सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पात श्रीमती मंदा श्रीधर पाटणकर यांच्या स्मृति प्रित्यर्थ मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन सोहळा संपन्न.





>अनामप्रेम सत्येमव जयते ग्राम प्रकल्पातील थ्री फेज विजेचे काम पूर्ण झाले.

## >अनामप्रेमचे गुणवंत



कुमारी कल्पना पंजाबराव कदम – राष्ट्रीय खेळाडू .गोलबॉल या स्पर्धा प्रकारात भारतीय संघामध्ये निवड तसेच उत्कृष्ट राष्ट्रीय खेळाडू म्हणून सन्मानित तसेच योगासन स्पर्धेमध्ये सुवर्ण पदक.



सौदागर बाळू लोंढे संगीत विशारद अंधत्वावर मात करुन UGC NET परीक्षा उत्तीर्ण.



आनंद संतोष माळवे राज्यस्तरीय खेळाडू संगणक शिक्षक राज्यस्तरीय गोलबॉल स्पर्धेच्या विजयी संघाचे नेतृत्व. करुन UGC NET परीक्षा उत्तीर्ण.



चेतन ठकाजी लांडगे इंग्रजी भाषा शिक्षक राष्ट्रीय स्तरावरील **SSC-CGL** परीक्षा उत्तीर्ण होऊन टेक्स्टाईल विभागात निवड.



गणेश अण्णासाहेब बावस्कर – स्पायनल कॉर्ड इंजुरी रिहॅब सेंटर मधील लाभार्थी. महाराष्ट्राच्या क्रिकेट संघामध्ये निवड.



प्रल्हाद साळुबा पांडव– विवेकानंद कॉलेज, संभाजीनगर येथे TTI द्वारा संगणक शिक्षक.

# अनामप्रेमचे महत्वाचे उपक्रम व मान्यवरांच्या भेटी



अनामप्रेमच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पात मा. बच्चुभाऊ कडू यांच्या हस्ते कौशल्य विकास केंद्र व दिव्यांग मेळाव्याचे भव्य उद्घाटन उत्साहात पार पडले. या उपक्रमामुळे दिव्यांग बांधवांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन आत्मनिर्भरतेचा नवा मार्ग खुला झाला आहे.

अनामप्रेममध्ये गोशाळा विभाग गोसेवा आयोग समितीच्या पदाधिकाऱ्यांची भेट –

अनामप्रेम संचलित गौरांग अभिनव शाळा (अंध व अस्थिव्यंग मुलांसाठी) येथे **Toybank** टॉय बँक सत्र आनंद आणि उत्साहात पार पडले.

सतत भेडसावणाऱ्या पाण्याच्या अडचणीवर मात करण्यासाठी सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पामध्ये नवीन विहिरीचे खोदकाम करण्यात आले.



अनामप्रेम संचलित गौरांग अभिनव शाळेत १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन सोहळा उत्साहात साजरा झाला. वीर पत्नींच्या शुभहस्ते झालेल्या ध्वजारोहणाने सोहळ्याला विशेष गौरव लाभला.

मुंबई ग्राहक पंचायत आयोजित 'सेतू बांधा रे' कार्यक्रमात अंधेरी येथील स्टॉलवर महाराष्ट्र राज्याचे उद्योग मंत्री मा. उदय सामंत साहेब यांचा अनामप्रेम संस्थेच्या वतीने बुके देऊन सत्कार करण्यात आला.

नवी दिल्ली येथे राष्ट्रीय पातळीवर आयोजित नॅशनल पॅरा योगासन स्पोर्ट्स चॅम्पियनशिप २०२५-२६ या स्पर्धेत अनामप्रेमची कन्या कु. कल्पना कदम हिने अंध विभागातून प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदक (Gold Medal) मिळवले आहे.




गौरवाचा क्षण – गोरांग शाळेचे विशेष शिक्षक मा.श्री. रामू बांडेबुचे यांचा आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालय, पुणे यांच्या शिबिरात अनामप्रेमच्या विद्यार्थ्यांचा सहभाग.

अनामप्रेमच्या आधारग्राम येथील यशवंत प्रकल्पात असलेल्या स्पाइनल कॉर्ड इंजुरी रिहॅब सेंटर येथे आदरणीय डॉ.कै.विजय गर्दे यांच्या प्रतिमेचे पूजन करून या सेंटरचा दुसरा वर्धापन दिन साजरा करण्यात आला.

प्रदूषणमुक्त दिवाळीचा सुंदर संदेश देत अरणगाव येथील संस्कार अकादमीच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी अनामप्रेम संस्थेतील दिव्यांग मुलांना फराळ, किराणा किट, शैक्षणिक साहित्य व ड्रेसचे वाटप करून आनंदाचा दीप प्रज्वलित केला.

आरंभ संस्थेच्या स्पंदन २.० या प्रदर्शनामध्ये अनामप्रेमच्या दिव्यांग बांधवांनी तयार केलेल्या वस्तूंच्या विक्री-प्रदर्शनात स्टॉलला छ. संभाजीनगर येथील जिल्हाधिकारी मा. दिलीप स्वामी सर यांनी भेट देऊन मुलांनी बनविलेल्या वस्तूंची माहिती जाणून घेतली.

## >अनामप्रेमचे गुणवंत



कु.श्रावणी महाराष्ट्र शासनाच्या सांख्यिकी विभागामध्ये अन्वेषक म्हणून नियुक्ती.



कु. गौरी गणेश इंगळे-विशाल गणपती ट्रस्ट आयोजित जिल्हास्तरीय संगीत स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक. युवा महोत्सवात संगीत विभागात प्रथम क्रमांक.



चि. राहुल बबन पेटारे-IWR फाउंडेशन जमशेदपूर द्वारा इंडिया वर्ल्ड रेकॉर्ड व मानद डॉक्टरेटने सन्मानित.



चि. अंकुश सुरेश खंडेलोटे-राज्यस्तरीय गीत गायन स्पर्धा व अखिल गंधर्व महाविद्यालय, मुंबई संगीत स्पर्धा यामध्ये प्रथम क्रमांक.

# अनामप्रेमचे महत्वाचे उपक्रम व मान्यवरांच्या भेटी

रोटरी क्लब कडुन अनामप्रेम संचलित गौरांग अभिनव शाळेला नवीन संगणक संच भेट.

हेलन केलर यांची १४५ वी जयंती ग्राम प्रकल्पात उत्साहात साजरी..!

।।वृक्षवल्ली



आम्हा सोयरे वनचरे ।। पर्यावरणप्रेम आणि समाजसेवेचा अनोखा संगम..!

श्री अशोक साळुंखे यांनी त्यांचा ६३ वा वाढदिवस अनामप्रेमच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पात ६३ उपयुक्त वृक्षांची लागवड करून आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा केला.

राष्ट्रीय दृष्टिहीन संघ आयोजित युवा महोत्सव, आळंदी येथे अनामप्रेमची विद्यार्थिनी कु. गौरी इंगळे हिने गायन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला..!

अनामप्रेम व **IMA** यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत रोग निदान शिबीर यशस्वीरित्या संपन्न झाले.



चैतन्य फाउंडेशनकडून दिव्यांग विद्यार्थ्यांना शैक्षणिक किटचे वाटप

मुंबई येथील केशवसृष्टी प्रमुखांची अनामप्रेम छत्रपती संभाजीनगर प्रकल्पाला सदिच्छा भेट.



अनामप्रेम संस्थेतर्फे दिव्यांग (अंध, अस्थिव्यंग व मूकबधिर) विद्यार्थ्यांसाठी आयोजित **MSCIT** कोर्सचा निकाल १००% लागला. उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक.

अनामप्रेम संस्थेच्या उद्योगभवनात क्रॉक्स मशीनचे उद्घाटन करून दिव्यांगांसाठी रोजगाराची नवी दिशा सुरु करण्यात आली.

अनामप्रेम संस्था – सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प, नोबेल सेवा आश्रम येथे 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमांतर्गत दिव्यांग विद्यार्थ्यांनी विविध झाडांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा सुंदर संदेश दिला.

FRST फाउंडेशन, मुंबई यांच्या वतीने अनामप्रेम संस्थेतील अंध विद्यार्थ्यांना विशेष सुरक्षा जॅकेट व रेनकोटचे वाटप करण्यात आले.



अनामप्रेममध्ये दिव्यांग मुलांची आगळेवेगळे रक्षाबंधन.. अनामप्रेम, सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प निंबळक येथे अंध, अस्थिव्यंग व मूकबधिर मुलांनी राखीपौर्णिमा उत्साहात साजरी केली.

We Together Foundation च्या सदस्यांची ग्राम प्रकल्पास भेट – अनामप्रेम परिवाराला दरमहा किराणा स्वरुपात मदत करत असलेल्या मुंबई येथील महिला समूहाने अनामप्रेमच्या विविध प्रकल्पांना भेटी दिल्या...

# अनामप्रेमचे महत्वाचे उपक्रम



पूरग्रस्त दिव्यांग बांधवांसाठी अनामप्रेम संस्थेचा मदतीचा हात. मुसळधार पावसामुळे निर्माण झालेल्या पुरस्थितीत अनामप्रेम परिवाराने मानवतेचा सुंदर आदर्श घालून दिला आहे. नगर जिल्ह्यातील शेवगाव, पाथर्डी व नगर तालुक्यातील पूरग्रस्त दिव्यांग बांधवांना घरपोच किराणा किट, आवश्यक साहित्य आणि मानसिक आधार देऊन त्यांच्यापर्यंत आशेचा किरण पोहोचवला.

स्नेहालय परिवार आयोजित विशेष शासकीय सेवा कॅम्पद्वारे संजय गांधी निराधार, रेशन कार्ड व आधार अपडेट या योजना लाभार्थ्यांपर्यंत यशस्वीपणे पोहोचविण्यात आल्या. या उपक्रमात अनामप्रेम परिवारातील १४ विद्यार्थ्यांचे आधार अपडेट व २ लाभार्थ्यांना नवीन रेशन कार्ड मिळाले.




जागतिक अंध दिन – जनजागृती रॅली

अनामप्रेम संस्था संचलित गौरांग अभिनव शाळेत जागतिक अंध दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विशेष मुलांनी प्रेरणादायी घोषणा देत रॅली काढली व समाजात समानता, संवेदनशीलता आणि जागरूकतेचा संदेश दिला. हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वास वृद्धीसोबतच सामाजिक जनजागृतीसाठी महत्त्वपूर्ण ठरला.

मायेची ऊब – थंडीग्रस्तांसाठी मदत उपक्रम

अनामप्रेम संस्थेतर्फे थंडीग्रस्त गरीब व दिव्यांग बांधवांना उबदार ब्लँकेट व गरम कपड्यांचे वाटप करण्यात आले. रात्रीच्या वेळी कार्यकर्त्यांनी रेल्वे स्टेशन, बसस्थानक आणि सार्वजनिक ठिकाणी भेट देत बेघर, प्रवासी व असहाय व्यक्तींना मदतीचा हात देऊन मानवतेचा महत्त्वपूर्ण संदेश दिला.



सोलर उर्जा प्रकल्प – ऊर्जा स्वावलंबनाचा नवा टप्पा

अनामप्रेमच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प (निंबळक) येथे लायन्स क्लब पुणे, विजयनगर यांच्या सहकार्याने कौशल्य विकास केंद्रासाठी स्वतंत्र सोलर ग्रीड सिस्टीम उभारण्यात आली.



अनामप्रेम – सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पात ७ वा गौरांग अभिष्टचिंतन सोहळा उत्साहात संपन्न झाला.

राष्ट्रीय दृष्टीहीन संघ महाराष्ट्र यांच्या मार्फत आयोजित अंध कल्याण सप्ताहमध्ये अनामप्रेम टीमने सहभागी होऊन विशेष कामगिरी केली.

# यशोगाथा



अनामप्रेम संस्था गेल्या अनेक वर्षांपासून अंध, अस्थिव्यंग आणि मूकबधिर विद्यार्थ्यांसाठी मायेचा आधार ठरली आहे. मी अंध प्रवर्गातील असून येथे आल्यानंतर मला आपुलकीचे, सुरक्षित आणि प्रोत्साहन देणारे वातावरण मिळाले. प्रत्येक विद्यार्थ्याच्या गरजेनुसार शिक्षण, प्रशिक्षण आणि मार्गदर्शन मिळाल्याने *दिव्यांग* ही केवळ ओळख न राहता आत्मविश्वासाने पुढे जाण्याची शक्ती आम्हाला येथे प्राप्त होते.

संस्थेने शिक्षण, वसतिगृह, वेगवेगळ्या प्रकारच्या कार्यशाळा, उपचार, कौशल्य-विकास आणि रोजगाराच्या संधी यांची सलग आणि परिणामकारक सांगड घालून हजारो विद्यार्थ्यांचे आयुष्य उजळून टाकले आहे. आज मी श्रम व रोजगार मंत्रालयात कार्यरत आहे, आणि या प्रवासाला शक्य करणारा सर्वात मोठा कारणाभूत आधार म्हणजे अनामप्रेम संस्थेची निस्वार्थ मदत व मार्गदर्शन.

अशा संवेदनशील, कार्यतत्पर आणि मानवतावादी संस्थेचा विद्यार्थी असल्याचा मला मनापासून अभिमान वाटतो.

– अजिनाथ दांडगे

(राज्य कर्मचारी विमा महामंडळ, पुणे)

---



२०१२ साली मी अनामप्रेम संस्थेशी जोडला गेलो, आणि तेव्हापासून माझ्या आयुष्याला खरा दिशादर्शक मिळाला. येथे मला केवळ शिक्षणच नाही, तर आत्मविश्वास, स्वावलंबन आणि जगण्याकडे पाहण्याची नवी, सकारात्मक दृष्टी मिळाली. अनामप्रेमचे कार्यकर्ते, शिक्षकांचे संवेदनशील मार्गदर्शन, सातत्यपूर्ण प्रोत्साहन आणि कौशल्य-विकासाच्या संधींमुळे मी दहावीपासून पदवीपर्यंतचा शैक्षणिक प्रवास यशस्वीरीत्या पूर्ण करू शकलो.

अनामप्रेमच्या दृढ आधारामुळेच मी स्पर्धा परीक्षांची तयारी अखंडपणे सुरू ठेवू शकलो आणि अखेरीस डिसेंबर २०२२ मध्ये राज्य कर्मचारी विमा महामंडळ, पुणे येथे सरकारी सेवेत रुजू होण्याचे स्वप्न साकार झाले. आज मी सक्षम, आत्मनिर्भर आणि आत्मविश्वासपूर्ण आहे-आणि हे संपूर्णपणे शक्य झाले ते अनामप्रेम संस्थेच्या नि:स्वार्थ पाठिंबा व काळजीपूर्ण मार्गदर्शनामुळे.

-विराज देशमुख

(राज्य कर्मचारी विमा महामंडळ, पुणे)

---



मी ज्ञानेश्वर गडाख, अनामप्रेम संस्थेचा माजी विद्यार्थी. माझे इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतचे शिक्षण माझ्या गावाकडेच पूर्ण झाले. सन २०१२ मध्ये शालेय मित्रांकडून अनामप्रेम संस्थेबाबत माहिती मिळाल्यानंतर मी विद्यार्थी म्हणून या संस्थेत प्रवेश घेतला.

संस्थेत प्रवेश घेतल्यानंतर मिळालेले शैक्षणिक मार्गदर्शन, शिस्तबद्ध व संस्कारक्षम वातावरण तसेच कार्यकर्त्यांचे प्रेमळ व मार्गदर्शक सहकार्य यामुळे माझ्या जीवनाला योग्य दिशा मिळाली. विद्यार्थी जीवनातच अनामप्रेम संस्थेने माझ्यामध्ये आत्मविश्वास, कष्ट करण्याची सवय आणि जबाबदारीची जाणीव निर्माण केली.

संस्थेत वास्तव्यास असताना मला संस्थेच्या विविध उपक्रमांमध्ये कार्यकर्त्यांच्या भूमिकेत काम करण्याची संधी मिळाली. या अनुभवातून माझ्या सामाजिक जाणीवा वृद्धिंगत झाल्या तसेच नेतृत्वगुण विकसित होण्यास मदत झाली.

अनामप्रेममध्ये मिळालेल्या संस्कारांच्या बळावर मी स्पर्धा परीक्षांची तयारी केली आणि दिनांक ७ ऑक्टोबर २०२० रोजी भारतीय अन्न महामंडळामध्ये शासकीय सेवेत रुजू होण्याचे भाग्य मला लाभले. आज मी शासकीय सेवेत कार्यरत असलो, तरी माझ्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत अनामप्रेम संस्थेचा वाटा अत्यंत मोलाचा आहे. माझ्या आयुष्याला एक सुंदर वळण देणारी आनंदाची गोष्ट म्हणजे माझे लग्न. याचे श्रेय देखील अनामप्रेम संस्थेलाच जाते.

अनामप्रेम ही संस्था माझ्यासाठी केवळ शिक्षण देणारी नव्हे, तर आत्मनिर्भर, सुसंस्कृत व जबाबदार नागरिक घडविणारी एक जीवनशाळा आहे. या संस्थेबद्दल माझ्या मनात सदैव कृतज्ञता आणि अभिमानाची भावना आहे.

-ज्ञानेश्वर गडाख

(भारतीय अन्न महामंडळ)

# विद्यार्थी पालक मनोगत



मी बबन बाबुराव पेटारे, रा. अस्तगाव, ता. राहाता जि. अहिल्यानगर मला दोन मुलगे आणि एक मुलगी आहेत. दुर्दैवाने तिघेही अंध आहेत. श्रीरामपूर येथील शाळेत मुलांचे शिक्षण सुरू असताना आम्हाला एक अंध मुलगा भेटला. त्याला आई-वडील नसल्याने आम्ही त्यालाही मायेने आमच्या घरी आणले. अशा प्रकारे आमच्या कुटुंबात तीन अंध मुले आणि एक अंध मुलगी आहेत.

मुलांचे बारावीपर्यंतचे शिक्षण गावीच पूर्ण झाले. मात्र त्यानंतर त्यांच्या भवितव्याबाबत मनात अनेक प्रश्न आणि चिंता निर्माण झाल्या. याच काळात आम्हाला अनामप्रेम संस्थेबद्दल माहिती मिळाली. सुरुवातीला मनात काही शंका होत्या; परंतु प्रत्यक्ष संस्थेला भेट दिल्यानंतर येथील स्वच्छ, सुरक्षित व आपुलकीचे वातावरण, उत्तम राहण्याची व्यवस्था, शिक्षकांची मायेची वागणूक आणि मुलांची घेतली जाणारी काळजी पाहून आम्हाला मोठा दिलासा मिळाला. त्यामुळे आम्ही आमच्या तिन्ही मुलांना अनामप्रेम संस्थेत दाखल करण्याचा निर्णय घेतला.

अनामप्रेम संस्था दिव्यांग मुलांसाठी अत्यंत निष्ठेने व समर्पणाने कार्य करत आहे. ही संस्था केवळ शिक्षणापुरती मर्यादित न राहता मुलांना विविध कौशल्यांचे प्रशिक्षण देऊन त्यांना स्वावलंबी बनवते आणि स्वतःच्या पायावर उभे राहण्याची संधी देते. या संस्थेमुळे अनेक दिव्यांग मुलांचे जीवन सकारात्मक दिशेने बदलले आहे.

आमच्या मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी अशी भक्कम साथ देणाऱ्या अनामप्रेम संस्थेबद्दल मी मनापासून कृतज्ञ आहे. संस्थेचे हे समाजोपयोगी कार्य असेच अखंडपणे सुरू राहो, हीच माझी मनःपूर्वक इच्छा आहे.

– बबन बाबुराव पेटारे
राहूल पेटारे याचे पालक

---



मी हेमंत पंडित मोरे, रा. दळवी वस्ती, ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर. माझी मुलगी मूकबधिर असल्यामुळे तिच्या शिक्षणासाठी मी तिला जानकीबाई आपटे प्रशाला येथे प्रवेश घेऊन दिला. शिक्षणासाठी वस्तीगृहाची आवश्यकता असल्याने सुरुवातीला आम्ही एका खाजगी वस्तीगृहात तिचा प्रवेश घेतला; मात्र तेथील सुविधा समाधानकारक नसल्याने तिची तब्येत खालावली.

त्यानंतर आम्हाला अनामप्रेम संस्थेबद्दल माहिती मिळाली. खात्री करून घेण्यासाठी आम्ही स्वतः संस्थेच्या वस्तीगृहाला भेट दिली. येथे स्वच्छ व प्रसन्न वातावरण, सुरक्षित व्यवस्था, योग्य निवास व पौष्टिक जेवणाची सोय, तसेच विद्यार्थ्यांशी आपुलकीने वागणारा संवेदनशील कर्मचारी वर्ग पाहून आम्ही अत्यंत प्रभावित झालो. विशेष बाब म्हणजे गोरगरीब विद्यार्थ्यांना येथे सर्व सुविधा पूर्णतः मोफत उपलब्ध करून दिल्या जातात.

संवेदनशील कर्मचारी वर्ग पाहून आम्ही अत्यंत प्रभावित झालो. विशेष बाब म्हणजे गोरगरीब विद्यार्थ्यांना येथे सर्व सुविधा पूर्णतः मोफत उपलब्ध करून दिल्या जातात. या सर्व गोष्टींचा विचार करून आम्ही आमच्या मुलीचा अनामप्रेम संस्थेत अत्यंत निर्धास्तपणे प्रवेश केला.

अनामप्रेम ही केवळ एक संस्था नसून विद्यार्थ्यांसाठी खऱ्या अर्थाने माय-बापाची भूमिका बजावणारी आहे. येथे प्रत्येक मुलाला प्रेम, काळजी आणि संरक्षण मिळते. आमच्यासारख्या पालकांसाठी ही भावना मोठा दिलासा देणारी आहे.

-हेमंत पंडित मोरे
नेहा मोरे हिचे पालक

# लेखापरीक्षण अहवाल

**To**
**The Board of Trustees**
Anamprem

**Report on the audit of the financial statements**
**Opinion**

We have audited the accompanying financial statement of the trust **Anamprem** which comprise the Balance Sheet as at March 31, 2025, the Income and Expenditure Account for the year ended, together with a summary of significant accounting policies and other explanatory notes.

In our opinion and to the best of our information and according to the explanations given to us, the financial statements give a true and fair view in conformity with applicable accounting standard and regulatory requirements: In the case of the **Balance Sheet**, of the state of affairs of the Anamprem as at 31 March 2025; In the case of the **Income and Expenditure Account**, of the Surplus / (Deficit) for the year ended on that date, in accordance with the accounting principle applicable to nonprofit organizations.

**Basis for Opinion :** We conducted our audit in accordance with the Standards on Auditing (SAs) issued by the Institute of Chartered Accountants of India (ICAI). Our responsibilities under those standards are further described in the Auditor's Responsibilities for the audit of the financial statements section of this report. We are independent of Anamprem in accordance with the relevant ethical requirements, and we have fulfilled our other ethical responsibilities in accordance with these requirements. We believe that the audit evidence we have obtained is sufficient and appropriate to provide a basis for our opinion.

**Key Audit Matters :** Valuation of Investment: verifying the fair value of investments held at year end. Donation compliance/utilization: whether amounts from donors are use in accordance with donor conditions. Recognition of fixed assets/depreciation: assessing whether capital assets are properly recorded and depreciated.

**Responsibilities of Management/ Trustees for the Financial Statements :** The Trustees/ Managing Committee are responsible for other information include in the annual report (other than the financial statements in an auditor's report thereon).

**Auditor's Responsibilities for the Audit of the Financial Statements :** Our objectives are to obtain reasonable assurance about whether the financial statements as a whole are free from material misstatement, whether due to fraud or error, and to issue an auditor's report that includes our opinion. Reasonable assurance is a high level of assurance, but does not guarantee that an audit conducted in accordance with SA's will always detect a material misstatement when it exists.

**Report on Other Legal and Regulatory Requirements :** Financial statements prepared as per Maharashtra Public Trust Act and Income Tax Act.

As required by Maharashtra Public Trust Act, we report that:

a) We have obtained all information and explanations which to the best of our knowledge and belief were necessary for the purposes of our audit;

b) In our opinion, proper books of accounts as required by law have been kept by the Anamprem so far as appears from our examination of those books;

c) The financial statements of the Anamprem comply with applicable accounting standards and other regulatory provisions;

d) The Balance Sheet, Income and Expenditure statement, together with the schedules and notes give the information required by the Act in the manner so required and give a true and fair view.

Date: 29th September, 2025
Place: Pune

CA Sukrut Dewarde
Membership No 170109
Sukrut Dewarde & Associates

# आर्थिक अहवाल

**The Bombay Public Trust Act, 1950**
**Schedule VIII [vide Rule 17(1)]**

**Name of the Public Trust : Anamprem** **Registration No : MAH/065/06/AHMEDNAGAR; AF9992**

**Balance Sheet as at 31st March 2025**

| Funds and Liabilities | 31-Mar-2025 Amounts (Rs) | 31-Mar-2025 Amounts (Rs) | Property and Assets | 31-Mar-2025 Amounts (Rs) | 31-Mar-2025 Amounts (Rs) |
|---|---|---|---|---|---|
| ***Trusts Fund or Corpus*** | | | ***Property, Plant and Equipment*** | | 5,32,31,523 |
| Balance as per last Balance Sheet | 31,70,748 | | As per schedule attached | | |
| Add: Utilisation | - | | | | |
| Add: Donation recived towards Corpus | 31,00,001 | 62,70,749 | | | |
| ***Other Earmarked Funds*** | | | ***Investments*** | | |
| Balance as per last Balance Sheet | 3,96,54,610 | | As per schedule attached | | 1,35,03,669 |
| Add : Donation Received | - | | | | |
| | | | (The market value of the above Investments | | |
| Add : Transfer from I & E Account | - | | Rs. 1,35,03,669) | | |
| | 3,96,54,610 | | | | |
| Less : Utilisation Tr to I & E Account | - | | | | |
| Less : Utilisation Tr to Corpus Fund | - | 3,96,54,610 | | | |
| ***Liabilities*** | | | ***Current Assets*** | | |
| For Expenses | 7,04,333 | | Advances & Loans | 69,500 | |
| TDS Payable | 1,608 | | Tax deducted as source & refunds | 1,43,707 | |
| Salary Payable | - | | Advance to suppliers | 2,00,397 | |
| Profession Tax Payable | - | | | | |
| Advances | - | 7,05,941 | **Bank Balance** | | |
| | | | In saving | 17,572 | |
| | | | In current | 30,83,714 | |
| | | | **Cash in Hand** | 69,516 | 35,84,406 |
| ***Income & Expenditure Account*** | | | | | |
| Balance as per last Balance Sheet | 1,97,04,218 | | | | |
| Add : Surplus / (Deficit) as per I & E Account | 39,84,524 | | | | |
| Add : Prior year adjustments | (443) | | | | |
| Add : Transfer from other Earmarked Funds | - | | | | |
| Less : Transfer to other Earmarked Funds | - | 2,36,88,299 | | | |
| | | **7,03,19,598** | | | **7,03,19,598** |

As per our report of even date
Sukrut Dewarde & Associates
Chartered Accountants
Firm Registration No. 153539W

Sukrut Dewarde & Associates Chartered Accountants, Pune FRN 153539W

Sukrut Dewarde
Membership No. 170109
Place: Pune
Date: 29th September 2025
UDIN : 25170109BMNURB4737

The above Balance Sheet to the best of my / our belief contains a true account of the Funds and Liabilities and of the Property and / Assets of the Trust.

For Anamprem

ANAMPREM TRUST NO. 065/2006 REG. NO. F-9992 AHMEDNAGAR

Trustee
Place: Ahmednagar
Date: 29th September 2025

Trustee
Place: Ahmednagar
Date: 29th September 2025

PRESIDENT
ANAMPREM
A.NAGAR

SECRETARY
ANAMPREM
A.NAGAR

TREASURER
ANAMPREM
A.NAGAR

# अनामप्रेमचे पाठीराखे

अनामप्रेम संस्थेने २००५ पासून दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षण, प्रशिक्षण, पुनर्वसन व रोजगाराच्या क्षेत्रात केलेले कार्य अत्यंत अनुकरणीय आणि प्रशंसनीय आहे. मोफत भोजन, निवास आणि सुरक्षित वातावरणाची सोय करून संस्थेने हजारो अंध, मूकबधिर व अस्थिव्यंग मुला-मुलींना नवी दिशा, नवे स्वप्न आणि सक्षम भविष्य दिले आहे. अहिल्यानगर, पुणे आणि छत्रपती संभाजीनगर येथील निवासी प्रकल्पांतून दरवर्षी अनेक विद्यार्थ्यांना मिळणारा आधार संस्थेच्या समर्पणाची, संवेदनशीलतेची आणि सातत्यपूर्ण कर्तव्यनिष्ठेची साक्ष देतो.

सरकारी अनुदानाशिवाय केवळ समाजातील उदार दात्यांच्या पाठबळावर इतके व्यापक प्रकल्प समर्थपणे राबविणे ही संस्थेच्या पारदर्शक कार्यपद्धतीची आणि दृढ सामाजिक बांधिलकीची जाणीव करून देणारी बाब आहे. निंबळक, पुणे आणि संभाजीनगर येथील वसतिगृह, कौशल्य-विकास केंद्र, नोकरी प्रशिक्षण उपक्रम, गौरांग शाळा तसेच शेती व उद्योग प्रकल्प यांमधून असंख्य लाभार्थी स्वावलंबनाकडे वाटचाल करीत आहेत. यशवंत प्रकल्पातील स्पायनल कॉर्ड इन्जुरी सेंटरमुळे गंभीर दुखापतीनंतर व्हीलचेअरवर अवलंबून राहणाऱ्या अनेकांना नव्याने जगण्याची उमेद व आधार मिळत आहे.

अनामप्रेम संस्थेचे हे सातत्यपूर्ण, संवेदनशील आणि मानवतावादी कार्य पाहून आम्हा दात्यांना मनःपूर्वक समाधान लाभते. समाजातील दिव्यांग बांधवांना सक्षम, स्वाभिमानी आणि सन्माननीय जीवन प्राप्त व्हावे, या उदात्त ध्येयासाठी संस्था जी निष्ठा, प्रेम आणि समर्पणाने सेवा देत आहे, त्यास आमचे मनःपूर्वक समर्थन, शुभेच्छा आणि कृतज्ञ अभिवादन.

–प्रा. योगिता काळे व श्री. सी.डी. मोहत्ता

---


संस्थेतील दिव्यांग बांधवांच्या कौशल्यातून बनवण्यात आलेल्या दर्जेदार वस्तू

**अनामप्रेम कौशल्य विकासालय** अंतर्गत **कौशल्य निर्मिती**



हवाई चप्पल, क्रॉक्स

दिव्यांग निर्मित उत्पादने खरेदी करुन त्यांना रोजगारक्षम बनवा.



नॅपकिन बुके, सॅनिटरी पॅड

गांधी मैदान, अहिल्यानगर. मो. 7350013805





मुख्य ऑफिस (गांधी मैदान) : 9011004576, 9422054956
सत्यमेव जयते ग्राम (निंबळक) : 7350517778, 7350013805
यशवंत प्रकल्प (इसळक) : 9011918786, 9422307116

कौशल्य विकास केंद्र, निंबळक : 9011918786, 8788548677
पुणे प्रकल्प : 9011750022, 9372404963
छ.संभाजीनगर प्रकल्प : 9011750035, 9921509199

# अनामप्रेमचे मार्गदर्शक

श्री. सुवालालजी शिंगवी
सी.ए. सतीश सोमण
सौ. वैशाली चेके
श्री. बाळासाहेब भोरे
डॉ. सुवर्णा गणवीर
श्री. अविनाश मुंडके
श्री. यशवंत कुरापट्टी

श्री. संजय गुगळे
श्री. मिलिंद कुलकर्णी
सौ. शीला संचेती
सौ. मिना बेदरकर
डॉ. मार्सिया वॉरन
श्री. दीपक बुरम
श्री. अमित डोईफोडे

श्री. राजीव सिंग
श्री. दिपक देशपांडे
सौ. अनिता माने
श्री. अजित बेदरकर
डॉ. अभिजीत बोरुडे
श्री. उमेश पंडुरे
श्री. फिरोज तांबटकर

सौ. ज्योती एकबोटे
श्री. राजीव गुजर
डॉ. हेमंत देशपांडे
श्री. किशोर कुलकर्णी
डॉ. चेतना बहुरूपी
प्रा. प्रमोद तांबे
श्री. शशिकांत सातभाई

# अनामप्रेमचे सेवाव्रती


अभय रायकवाड


विष्णु वारकरी


रामदास काकडे


विक्रम प्रभु


प्रविण नवले


भारती सोनवणे


राहुल खिरोडे


सुनिल कांबळे


सुरेखा राठोड


सुरेखा कोतकर


माधवी सैंदाणे


रामु बांडेबुचे


राजु भगत


अमृत भुसारी


प्रकाश गजे


शुभांगी वारकरी


मनोज दंडीमे


बद्रिनाथ कुटे


पोपट लोंढे


पल्लवी मकासरे


अक्षयकुमार राऊत


शिवानंद राऊत


शिवलाल पाल


मुंजाजी गालफडे


संतोष फुलसौंदर


सचिन गारदे


विद्या रानवडे


रोहित लाटणे

# अनामप्रेमचे सहयोगी

ANH

SMC Infrastructure Pvt. Ltd.

KSB

MELZER CHEMICALS PVT LTD

स्थापना 1989 प्रेरणा – सहयोग Snehalaya

SEDEMAC

I ♥ नगर YOUR LOVE FOR THE CITY

SURAJ

GALLAGHER

amazon

Infosys

Vinayak Engineering Systems Pvt. Ltd.

Pitambari INNOVATIVE PRODUCTS

LCEPL

LIONS INTERNATIONAL

BECKHOFF

MAN Energy Solutions Future in the making

Endress+Hauser People for Process Automation

Skyline Reality Private Limited

ORBIS

श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

chaitanya SOCIAL WELFARE FOUNDATION

Manusaki

FRST FOUNDATION

- Suraz Family Trust
- Mohatta Foundation
- Dr. Ravindra Marathe
- Dr. Ravindra Somani
- Mrs.Pramila Kulkarni
- Vatsalya Trust
- Shankar Maharaj Trust
- We Together Foundation



# दिव्यांग हिताय, नित्य समर्पण

- अनामप्रेम, गांधी मैदान, अहिल्यानगर (अहमदनगर) 414001
- सत्यमेव जयते ग्राम, निंबळक, ता. जि.अहिल्यानगर 414111
- पुणे प्रकल्प, सायली सोसायटी, चैतन्यनगर मैदान जवळ, धनकवडी, पुणे-411043.
- छ.संभाजीनगर (औ.बाद) प्रकल्प, सूतगिरणी रोड, गारखेडा परिसर, छ.संभाजीनगर 431009

Email - anampreminfo@gmail.com
www.anamprem.org

Follow us On
facebook.com/anamprem
instagram/anamprem 2005
youtube.com/anamprem

## देणगी देण्याकरीता बँक तपशिल

| | |
|---|---|
| Bank Name | **State Bank Of India** |
| Name Of Account | **ANAMPREM** |
| Branch | **Kalyan road ( SME ), Ahilyanagar (Ahmednagar)** |
| Account No | **32144934687** |
| Account Type | **Current** |
| IFSC Code | **SBIN0014794** |

आपण देणगी ऑनलाईन जमा केल्यावर पावतीसाठी आपले नाव, पॅन नंबर, पत्ता, मेल आयडी व फोन नंबर ही माहिती संस्थेला **anampreminfo@gmail.com** या मेल वर अथवा 9011004576 या संपर्क क्रमांकावर कळवावे.